सेवार्थ प्रणालीत अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे समाविष्ट करण्याकरिता क्षेत्रिय कार्यालयांसाठी सर्वसाधारण सूचना

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः- सेवार्थ २०१९/(प्र.क्र.९० /२०१९)/आ(क्षेप्र)

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-३२
तारीख: ३०/०८/२०१९

परिपत्रकः-

जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील विविध पाटबंधारे महामंडळ कार्यालयांतर्गत बांधकाम कार्यप्रकारातील विभाग, उपविभागीय कार्यालयांची मंडळनिहाय फेररचना केल्याने तसेच बांधकाम कार्यप्रकारांचे सिंचन कार्यप्रकारात रुपांतर केल्याने, कार्यालयांच्या मुख्यालयात बदल झाल्याने, कर्मचाऱ्यांची एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात बदली झाल्याने अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करण्याचे प्रस्ताव शासनास प्राप्त होतात. सदर प्रस्ताव परिपूर्ण स्वरुपात नसल्याने क्षेत्रिय कार्यालयांकडून त्रुटींची पूर्तता करुन घेवून अधिकारी/कर्मचारी यांची पदे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करावी लागतात. सदर त्रुटींची पूर्तता करण्यास क्षेत्रिय कार्यालयांकडून अनेकदा विलंब होतो. त्यामुळे क्षेत्रिय कार्यालयांकडून कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन अदा करणे शक्य होत नाही. अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविताना क्षेत्रिय कार्यालयांना सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

२. या अनुषंगाने अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविताना खालील सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

१) अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करण्याचे प्रस्ताव शासनाकडे पाठविताना कर्मचाऱ्यांच्या वरिष्ठ नियंत्रक कार्यालयामार्फत पाठविण्यात यावेत. प्रस्तावासोबत सर्व आवश्यक कागदपत्रांच्या प्रती जोडण्यात याव्यात.

२) प्रस्तावात ज्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांतर्गत (DDO अंतर्गत) अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नावे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करावयाची आहेत, त्या कार्यालयाचा DDO Code व Scheme Code नमूद करण्यात यावा.

३) कर्मचाऱ्याची एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात बदली झाली असल्यास सदर बदली आदेशाची प्रत, बदलीच्या पदावर रुजू झाल्याचा दिनांक याची माहिती प्रस्तावासोबत सादर करावी.

४) ज्या कार्यालयाची पदे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करावयाची आहेत, त्या कार्यालयातील नियत अस्थायी/रुपांतरित अस्थायी आस्थापनेवरील पदांना वेळोवेळी मुदतवाढ मिळालेल्या शासन निर्णयाचा उल्लेख प्रस्तावात करावा व त्याची अद्ययावत प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

५) पदांना ज्या कालावधीतील मुदतवाढ प्राप्त झालेली असेल, त्या कालावधीतच पदांची नोंद सेवार्थ प्रणालीमध्ये करणे आवश्यक आहे. अन्यथा मुदतवाढ संपल्यानंतर पदे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट केल्यास ती प्रणालीमध्ये दिसत नाहीत. त्यामुळे मुदतवाढ मिळालेल्या कालावधीतच प्रस्ताव सादर करावा.

६) सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करावयाची पदे मुदतवाढ मिळालेल्या शासन निर्णयात ठळकपणे दर्शविण्यात यावीत.

७) नियत अस्थायी/रुपांतरित अस्थायी आस्थापनेवरील पदांना ज्या शासन निर्णयान्वये मुदतवाढ मिळाली आहे, तो शासन निर्णय क्षेत्रिय कार्यालयाने त्यांच्या Assistant login Id वरुन सेवार्थ प्रणालीतील GR Master मध्ये upload करावा.

८) प्रस्तावात नमूद केलेला Scheme Code प्रत्यक्षात सेवार्थ प्रणालीत कार्यान्वित (Activate) झालेला असणे आवश्यक आहे. (कार्यान्वित झालेला नसल्यास लेखा व कोषागारे संचालनालयाकडून कार्यान्वित करुन घेण्यात यावा.)

९) कार्यालय एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर झाले असल्यास, मुख्यालयात बदल झालेला असल्यास, अथवा बांधकाम प्रकारातून सिंचन प्रकारात रुपांतर झालेले असल्यास त्यासंबंधीचा शासन निर्णय प्रस्तावासोबत जोडण्यात यावा.

१०) कार्यालय रुपांतर झाल्यास कार्यालयाचा DDO व Scheme Code तसाच ठेवण्यात आला आहे का? तसाच ठेवला असल्यास, तसे पत्र लेखा व कोषागारे संचालनालयाला पाठविले होते का, याची माहिती सादर करण्यात यावी. (प्रत उपलब्ध करुन द्यावी.)

११) एकूण किती पदे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करावयाची आहेत त्याचा स्पष्ट उल्लेख प्रस्तावात करण्यात यावा.

१२) सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करावयांच्या पदांचे पदनिहाय व संख्यानुसार वर्गीकरण केलेले असावे.

१३) कर्मचाऱ्यांची नावे एका कार्यालयाच्या DDO मधून दुसऱ्या कार्यालयाच्या DDO मध्ये समाविष्ट करावयाची असल्यास पुर्वीच्या कार्यालयातून प्रथम सदर कर्मचाऱ्यांची नावे

Assistant login Id व Password वापरुन विलग (Detach) करण्यात यावीत. त्याचा उल्लेख प्रस्तावात करण्यात यावा.

१४) सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करावयाची पदे नियत अस्थायी आस्थापनेवरील आहेत किंवा रुपांतरित अस्थायी आस्थापनेवरील आहेत याचा स्पष्ट उल्लेख प्रस्तावात करण्यात यावा.

१५) कार्यालयाच्या Scheme Code मध्ये बदल झालेला असेल तर पदे नव्याने सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करण्याची आवश्यकता नाही.

१६) कर्मचाऱ्यांची पदे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करण्याच्या अभावी त्यांचे वेतन प्रलंबित असल्यास, केव्हापासून वेतन प्रलंबित आहे, याची माहिती व त्याची कारणे प्रस्तावासोबत द्यावीत.

१७) सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करावयाचे कर्मचारी नजीकच्या काळात सेवानिवृत्त होणार असल्यास त्याची माहिती प्रस्तावासोबत देणे. तसेच कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतनाचे प्रस्ताव Online सादर करावयाचे असल्यास व त्यामुळे कर्मचाऱ्यांची पदे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करणे आवश्यक असल्यास त्याचादेखील उल्लेख प्रस्तावात करणे.

१८) प्रस्तावात कर्मचाऱ्यांच्या नावासमोर दर्शविलेले त्यांचे पदनाम, प्रत्यक्षात सेवार्थ प्रणालीमध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेले पदनाम व मुदतवाढ मिळालेल्या शासन निर्णयात दर्शविलेले पदनाम एकच असावे. एकाच कर्मचाऱ्याचे वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळे पदनाम दर्शविता कामा नये.

१९) प्रस्तावातील संदर्भात नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे/शासन निर्णय/ कार्यालयीन आदेश प्रस्तावासोबत जोडण्यात यावेत.

३. उपरोक्त सुचनांचे तंतोतंत अनुपालन करण्यात यावे. वरील सुचनांचे पालन न केल्यामूळे अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनास अपूर्ण प्रस्ताव सादर करणाऱ्या कार्यालयाची व त्यांच्या वरिष्ठ नियंत्रक कार्यालयाची राहील.

४. सदर शासन परिपत्रक आपल्या अधिनस्त कार्यरत आस्थापनाविषयक बाबी हाताळणा-या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखांची राहील.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०८३०१२५२४६५५२७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uddhav Rabhaji Dahiphale

Digitally signed by Uddhav Rabhaji Dahiphale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=05b3ca49b9a0a924fd4d8743e6e254e742308f0210852 7986e098afc27201f30, serialNumber=2d80774c9ed65eca9be69006934bfb5c4ca32ab0 dc1a2ec5746398458bdf1c37, cn=Uddhav Rabhaji Dahiphale
Date: 2019.08.30 17:27:16 +05'30'

(उध्दव रभाजी दहिफळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. महासंचालक, संकल्पचित्र, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व धरण सुरक्षा, नाशिक.
२. सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
३. सर्व मुख्य अभियंता,जलसंपदा विभाग,
४. सर्व अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी,जलसंपदा विभाग,
५. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,

प्रत माहितीस्तव:-

१. प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. उपसचिव (प्रशा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत:- आ(क्षेप्र) संग्रहार्थ